# मुंबई विद्यापीठ

परीक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा जोतीराव फुले भवन
विद्यानगरी,
सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८,

क्र. परीक्षा/प.नि./१३९७/२०१३ दि. ११ ऑक्टोबर, २०१३

## परिपत्रक

सर्व प्राचार्य /केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, तृतीय वर्ष विज्ञान, कला व वाणिज्य Sem-V-(CBSGS) ऑक्टोबर–२०१३ च्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर झालेल्या चूकांमुळे प्रवेशपत्रात चूका असतील तर अशा वेळी त्या–त्या महाविद्यालयातील प्राचार्यांनी त्या विद्यार्थ्यांच्या हॉल–तिकीटावरील चूका (उदा. विषय, माध्यम इ.) आपल्या स्तरावर दुरुस्त करुन द्याव्यात, दुरुस्त केलेल्या हॉल–तिकीटाच्या झेरॉक्सच्या प्रती महाविद्यालयांच्या पत्रासह परीक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ व MKCL यांना पाठविण्यात याव्यात. तसेच संबधित परीक्षा केंद्रावरील केंद्र प्रमुख यांनी अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी द्यावी. ज्या विद्यार्थ्यांच्या हॉल–तिकीटावरील चूका दुरुस्त झाल्या नसतील अशा विद्यार्थ्यांनाही परीक्षा केंद्रावरील केंद्र प्रमुख यांनी हमीपत्र लिहून घेऊन परीक्षेस बसू द्यावे परंतू त्या–त्या संबधित महाविद्यालयातील प्राचार्यांकडून हॉल–तिकीटावरील चूका पुढील होणा–या इतर पेपरांस बसण्यासाठी दुरुस्त करुन घ्याव्यात. अडचण असल्यास केंद्र प्रमुखांनी विद्यापीठ परीक्षा विभागाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

महाविद्यालयाने केलेल्या दुरुस्त्या परीक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ व MKCL यांना न कळविल्यास निकालाच्या वेळी चूका होण्याची शक्यता असल्याने महाविद्यालयांनी पाठविलेल्या माहितीची पोंच घेऊन दप्तरी ठेवावी. अन्यथा त्यास संबधित प्राचार्य/केंद्र प्रमुख जबाबदार राहतील.

परीक्षा नियंत्रक

प्रति–

सर्व प्राचार्य व केंद्र प्रमुख संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये